# अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे

(महाराष्ट् शासनाची स्वायत्त संस्था)
शिवाजीनगर, पुणे - ५

दिनांक :- १५.१०.२०१५

## भारत सरकार शिष्यवृत्ती/फ्रिशीपच्या विषयी सूचना(OBC,SBC,VJNT,SC)

शैक्षणिक वर्ष २०१५-१६ चे ई-शिष्यवृत्ती अर्ज भरणे चालू झाले आहे. ज्या **विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये ( प्रथम वर्ष बी टेक,एम टेक व थेट द्वितीय वर्ष बी टेक ) प्रवेश घेतलेल्या मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांनीच** https://mahaeschol.maharashtra.gov.in **या वेबसाइटवर ऑनलाईन अर्ज भरुन अर्जाची एक प्रत व संबधित कागदपत्रे दि. २०.११.२०१५ पुर्वी लेखा विभागात सादर करावी.** उशीरा आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. तसेच जे विद्यार्थी द्वितीय तृतीय,चतुर्थ वर्ष बी टेक , द्वितीय वर्ष एम टेक मध्ये प्रवेशीत विद्यार्थ्यांनी वरील वेबसाइटवर ऑनलाअईन अर्ज करण्याची आवश्यकता नाही फक्त संबधित कागदपत्रे दि. २०.११.२०१५ पुर्वी लेखा विभागात सादर करावीत.

**जे विद्यार्थी ई-शिष्यवृत्तीचे ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरणार नाहीत अशा विद्यार्थ्यांना समाज कल्याण विभागाकडून शिष्यवृत्ती मिळणार नाही. अशा विद्यार्थ्यांनी खुल्या प्रवर्गाची कॉलेजची फि भरवयास लागेल.**

**ई-शिष्यवृत्तीचा अर्ज भरत असताना जोडवयची कागदपत्रे व घ्यावयाची काळजी खालीलप्रमाणे**

| क | सवलतीचा प्रकार | उत्पन्न मर्यादा | अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे |
|---|---|---|---|
| १ | **शिष्यवृत्ती**<br>१ अनुसूचित जाती (SC)<br>२ विमुक्त जाती व भटक्या जमाती(VJNT)<br>३ विशेष मागास प्रवर्ग(SBC)<br>४ इतर मागास प्रवर्ग(OBC) | रु.१,००,०००/- पर्यंत<br>(विमुक्त जाती व भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग, इतर मागास प्रवर्ग)<br>रु.२,००,०००/-पर्यंत<br>(अनुसूचित जाती ) | १ मागील वर्षाची गुणपत्रिका<br>२ जातीचे प्रमाणपत्र<br>३ जात पडताळणी प्रमाणपत्र<br>४ आधार कार्ड<br>५ शैक्षणिक वर्षात गॅप असल्यास तहसिलदारासमोरील प्रतिज्ञापत्र<br>६ उत्पन्नाचा दाखला<br>७ बॅंक पासबुक<br>८ कॉलेज Allotment Letter |
| २ | **फ्रिशीप**<br>अनुसूचित जाती (SC) | किमान रु.२,००,०००/- व कमाल मर्यादा नाही. | १ मागील वर्षाची गुणपत्रिका<br>२ जातीचे प्रमाणपत्र<br>३ जात पडताळणी प्रमाणपत्र<br>४ आधार कार्ड<br>५ शैक्षणिक वर्षात गॅप असल्यास तहसिलदारासमोरील प्रतिज्ञापत्र |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | फ्रिशीप<br>१ विमुक्त जाती व भटक्या जमाती(VJNT)<br>२ विशेष मागास प्रवर्ग(SBC)<br>३ इतर मागास वर्ग(OBC) | रु.१००००००/- पेक्षा जास्त व रु.४,५०,०००/- पर्यंत | १ मागील वर्षाची गुणपत्रिका<br>२ जातीचे प्रमाणपत्र<br>३ जात पडताळणी प्रमाणपत्र<br>४ शैक्षणिक वर्षात गॅप असल्यास तहसिलदारासमोरील प्रतिज्ञापत्र<br>५ नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र (१ एप्रिल २०१४ ते ३१ मार्च२०१५ पर्यंत)<br>६ आधार कार्ड |

१. https://mahaeschol.maharashtra.gov.in/MahaEschol/Scholarships/Account/Login.aspx या वेबसाईटवर अनुसूचित जाती (SC), विमुक्त जाती व भटक्या जमाती(VJNT), विशेष मागास प्रवर्ग(SBC), इतर मागास प्रवर्ग(OBC) विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने शिष्यवृत्ती /फ्रिशिपचा अर्ज भरावयाचा आहे. नवीन युजरच्या बाबतीत वरील वेबसाईटवर खाते उघडून सर्व माहिती भरुन आवश्यक कागदपत्रे स्कॅन करुन अपलोड करावयाची आहेत. युजरनेम व पासवर्ड कॉलेज शिकत असेपर्यंत लक्षात ठेवावा. अथवा कोठेतरी लिहून ठेवावा जेणेकरुन परत अर्ज भरताना अडचण येणार नाही.

२. विद्यार्थ्यांनी चुकीचा अथवा अपूर्ण अर्ज लेखा विभागात सादर करु नये. चुकीच्या अथवा अपूर्ण अर्जाचा विचार केला जाणार नाही. तसेच संबंधित विद्यार्थ्याला कळविले जाणार नाही. याची संपूर्ण जबाबदारी ही त्या विद्यार्थ्यांची असेल.

३. शिष्यवृत्ती व फ्रीशिपचा अर्ज परिपूर्ण व बिनचुक भरल्यानंतर त्याची एक प्रत लेखा विभागात सादर करावी.

४. वरील प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती /फ्रिशिपचा अर्ज भरत असताना एकाच शिष्यवृत्तीसाठी अर्ज करावा. दोन शिष्यवृत्ती /फ्रिशिपचा लाभ विद्यार्थ्यांनी घेवू नये.

५. फक्त शिष्यवृत्ती घेणा-या विद्यार्थ्यांस निर्वाह भत्ता मिळेल. फ्रिशिप घेणा-या विद्यार्थ्यांस वसतीगृह निर्वाह भत्ता मिळणार नाही.

६. विद्यार्थ्यांकडून कॉलेज शुल्कापोटी समाजकल्याण विभागाकडून प्राप्त न होणारी रक्कमच फक्त घेण्यात आलेली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती/फ्रिशिपची रक्कम मिळणार नाही. तसेच समाजकल्याण विभागाकडून उर्वरित रक्कम मिळण्यासाठी विद्यार्थ्यांनी भारत सरकार शिष्यवृत्ती / फ्रिशिपचे अर्ज भरणे आवश्यक आहे. ज्या विद्यार्थीनी वरील मागास प्रवर्गातील फि भरलेली आहे व जे विद्यार्थी शिष्यवृत्ती / फ्रिशिपचे अर्ज भरणार नाहीत अशा विद्यार्थ्यांनी खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्याप्रमाणे शुल्क भरावे.

७. शिष्यवृत्तीचा अर्ज भरणा-या विद्यार्थास निर्वाह भत्ता हा समाजकल्याण विभागाकडून थेट विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा केला जाणार आहे. त्यामुळे त्याची चौकशी लेखा विभागात वारंवार करु नये.

८. ज्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे अशा विद्यार्थ्यांनी स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये बँके खाते उघडणे अनिवार्य आहे.

९. वरील शिष्यवृत्तीचा अर्ज लेखा विभागात सादर केल्यानंतर त्याची पोच पावती (Student Undertaking / Acknowledgement Receipt) लेखा विभागातून घ्यावी तसेच पोच पावती शिष्यवृत्ती मिळेपर्यंत जपून ठेवावी. पोच पावतीशिवाय कोणतीही तकार ऐकूण घेतली जाणार नाही. पोच पावती हरविल्यास आपण शिष्यवृत्तीचा अर्ज भरला नाही असे समजण्यात येईल.

१० शिष्यवृत्ती अर्जाची छानणी करताना अर्जामध्ये / कागदपत्रामध्ये काही त्रुटी आढळल्यास त्याची यादी कॉलेजच्या वेब साईटवर Notices —> Scholarship Notices —> Scholarships for 2015-16 या टॅबच्या खाली लावण्यात येईल तसेच संबधित विद्यार्थ्यांनी त्याप्रमाणे असलेल्या त्रुटींचे निवारण करावे व जर आपण त्यांचे वेळेत निवारण केले नाही तर अशा विद्यार्थ्यांची नावे पुढील कार्यवाहीसाठी Dean Academics / Dean Students यांचेकडे पाठविली जाईल. काही विद्यार्थी गर्दीचा फायदा घेवून शिष्यवृत्ती/फिशीपचे अर्धवट भरलेले अर्ज व चुकीचे अंडरटेकिंग भरुन लेखाविभागात सादर करतात असे अर्ज लेखाविभागाच्या छानणीमध्ये लक्षात येतात. जे विद्यार्थी असे <u>अर्धवट/अपूर्ण/चुकीचे</u> अर्ज सादर करतील त्यांची नावे मा. संचालक/उपसंचालक यांना शिस्तभंगाच्या कार्यवाहीसाठी पाठवली जाईल. तसेच लेखाविभागाकडूनही जर नजरचुकीने अशा अर्जाची छानणी केली गेली तर त्या विद्यार्थ्यांने वेळीच झालेली चुक लक्षात आणून दयावी.

११ सर्व विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती / फिशिप विषयीच्या सर्व सूचना नोटीस बोर्डवर व कॉलेजच्या वेबसाईट,कॉलेजच्या वेबसाईटवरील मेल वेळच्या वेळी पाहाणे आवश्यक आहे. तसेच काही शंका असल्यास संबधित विभागाशी त्वरीत संपर्क साधून शंकेचे निरसन करुन घ्यावे. आम्हाला माहित नव्हते ही सबब चालणार नाही.

१२ विद्यार्थांनी वरील मुदतीमध्येच शिष्यवृत्ती /फिशीपचे अर्ज लेखाविभागामध्ये दुपारी २:३० ते सांय.५:३० यावेळेमध्येच जमा करावेत. वर दिलेल्या मुदतीनंतर अर्ज स्विकारले जाणार नाहीत व कोणतेही कारण विचारात घेतले जाणार नाही. त्याची सर्वस्वी जबाबदारी विद्यार्थ्याची असेल.

स्थानापन्न संचालक
अभियांत्रिकी महाविद्यालय
पुणे